माहितीचा
अधिकार

# राज्य माहिती आयोग, मुख्यालय, मुंबई

**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये**
**दाखल झालेले अपील**

**क्र.मुमाआ/नों.क्र.५८०५ / २३ /अ.क्र.८८०९/२५**

श्री.गंगाधर माने

विरुद्ध

जनमाहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी, (का-१४२६)
नियोजन विभाग, मंत्रालय विस्तार, दालन क्र.६१९,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.

प्रथम अपिलीय अधिकारी तथा अवर सचिव,
नियोजन विभाग, मंत्रालय विस्तार, दालन क्र.६१९,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.

**द्वितीय अपील अर्ज सुनावणी दिनांक : ०३.१२.२०२५**

| | | |
|---|---|---|
| अपीलकर्ता | : | अनुपस्थित |
| विद्यमान जन माहिती अधिकारी | : | उपस्थित |
| प्रथम अपीलीय अधिकारी | : | उपस्थित |

| मूळ अर्जाचा दिनांक | जन माहिती अधिकाऱ्याच्या उत्तराचा दिनांक | प्रथम अपीलाचा दिनांक | प्रथम अपीलीय प्राधिकाऱ्याच्या निर्णयाचा/आदेशाचा दिनांक |
|---|---|---|---|
| २७.०६.२०२३ | ३०.०६.२०२३ | १७.०७.२०२३ | ०१.०८.२०२३ |

प्रस्तुत प्रकरणी अपिलार्थींनी दाखल केलेल्या द्वितीय अपिल अर्जाचे अवलोकन केले असता यात त्यांच्या मूळ माहिती अर्जात नमूद केलेला विषय म्हणजेच दि.३१.०१.२०२३ रोजी अप्पर मुख्य सचिव नियोजन विभाग यांचे दालनात झालेल्या सुनावणीचे इतिवृत्त मागितले असून दि.३०.०६.२०२३ रोजीच तत्कालिन जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी, नियोजन विभाग यांनी वरील इतिवृत्ताची प्रत अपिलार्थींना प्रदान केली असून त्यात विरुध्द दाखल अपिल अर्जात ज्यात अपिलार्थी सुनावणीस गैरहजर होते.

त्यात मूळ **जोडपत्र अ** नुसार सुनावणीचे इतिवृत्त या आधीच देण्यात आले असल्याने अपिल निकाली काढले होते. त्याविरुध्द प्रस्तुत द्वितीय अपिल अर्ज दाखल केला असून आज देखिल अपिलार्थी सुनावणीस गैरहजर आहेत.

अपिलार्थींच्या मूळ जोडपत्रानुसार कार्यालयीन अभिलेखात **कलम २ (च)** प्रमाणे उपलब्ध असलेली माहिती ही त्यांना या आधीच प्रदान करण्यात आली असल्याची वस्तुस्थिती लक्षात घेता प्रस्तुत द्वितीय अपिल अर्ज पूर्णत: तथ्यहीन व गुणवत्ताहीन असून फेटाळण्यात येत आहे.

**आदेश**

**अपिल निकाली काढण्यात येत आहे.**

State Information Commission Maharashtra

**( राहुल भा.पांडे )**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**मुंबई**
**दिनांक : ०३-१२-२०२५**